
अबोली
केतकी शहा

# अबोली

केतकी शहा

ई साहित्य प्रतिष्ठान

# अबोली (दीर्घकथा)

लेखिका : केतकी शहा

+91(8007487799)

ketakee.shah@gmail.com

P-303, ग्रीनलँड काउटी, मानाजी नगर, नरहे, पुणे - ४११०४१

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशन ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :१४ नोव्हेंबर २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे - .आवश्यक आहे



# परिचय



मी  केतकी विजयानंद शहा.

मी आय टी क्षेत्रात कार्यरत आहे.

कामा व्यतिरिक्त मी लहानपणापासूनच लेखन आणि वाचन या माझ्या आवडी जपल्या आहेत.  त्यांना वेळोवेळी वाचन आणि विचार यांचे खतपाणी देऊन.. त्यांची योग्य निगा राखून त्यांना फुलवत ठेवलेले आहे.

मी लहानपणापासूनच अनेक कवीता , चारोळया करत आले आहे.  कथा  लेखनाचा हा  माझा पहलाच  प्रयत्न आहे.

मला लिखाणाबरोबरच  वाचनाची आवड आहे.. मला निरनिराळया  लेखकांच्या लेखनशैलीचा अभ्यास  करायला  आवडतो. मला मराठी चित्रपट आणि नाटके पाहायला आवडतात.

संपर्क क्रमांक -  +91(8007487799)

P-303, ग्रीनलँड काउटी, मानाजी नगर, नरहे, पुणे - ४११०४१

ई मेल - ketakee.shah@gmail.com

# मनोगत -

नमस्कार !!

कथा लिहण्याचा हा पहिलाच प्रयत्न.

मी लहानपणी पासूनच वाचन हा माझा छंद जोपासला आहे. अनेक कविता,कथा, कादंबरी, नाटके बरेच वाचन केले आहे.

पण मी स्वतः लिहीन असा विचार मी कधी केला नव्हता. आणि जेव्हा मी लिहायला सुरूवात केली तेव्हा हे लिखाण कुठेपर्यंत जाणार याची पुसटशी कल्पना हि मला नव्हती.

पण हे लिहून झाल्यावर वाटते आहे की अजूनही बरेच लिहायचे आहे..ही तर फक्त सुरूवात आहे.

या कथेमधे वेगवेगळया परिस्थितीवर मात करून जीवन जगण्याची नवी वाट शोधणाऱ्या .. आलेल्या प्रसंगाला धीराने सामोरे जाणाऱ्या व्यक्ती तुम्हाला भेटतील.

या व्यक्ती तुम्हालाही प्रेरणा देतील अशी आशा करते.

माझ्या या पहिल्या वहिल्या कथेला तुमच्यापर्यंत नेण्यासाठी मदत करणाऱ्या ई साहित्य टीम आणि श्री सुनील सामंत यांची मी मनःपुर्वक आभारी आहे.

केतकी शहा

पिता स्वर्ग, पिता धर्म, पिताहि परमं तप।

पितोरि प्रितिमा पन्ने प्रिय़न्ते सर्व देवताः॥

माझे वडील हे माझे प्रेरणास्थान आहेत. हे माझे पहिलेच कथापुष्प.

लिहण्याचा हा पहिलाच प्रयत्न

मी त्यांच्या चरणी अर्पण करते.

केतकी शहा

# अबोली

लेखिका – केतकी शहा

या कथेतील सर्व व्यक्ती, स्थळे व प्रसंग काल्पनिक असून त्यांचा कोणत्याही मृत किवा जीवित व्यक्तींशी साम्य आढळून आल्यास तो केवळ योगायोग समजावा

*प्रकरण १*

जुन्या कातीव लालसर रंगाच्या दगडांच्या त्या शाळेतून अबोली बाहेर पडली तेव्हा समोरच्या बोगनवेलीवर उतरत्या उन्हांमुळे एक वेगळीच झळाळी आली होती. त्या बोगनवेलीच्या सावलीत कधी अबोली बाबांची वाट पाही तर कधी बाबा अबोलीची. जास्त करून बाबाच आधी येत. अबोली आता पाचवीत होती... ती सरस्वती विद्या मंदिर मध्ये शिकत होती. शाळा घराजवळच होती... शाळेत सोडायला आणि आणायला सुधाकरराव जात असत.

अबोलीला थोडे थोडे कळायला लागल्यापासूनच आपल्याकडे काहीतरी नाही जे इतर बहुंतांश लोकांकडे आहे असे वाटत होते. बऱ्याचदा तिला ते जाणवत असे... पण तशी ती लहान असल्यामुळे बऱ्याच गोष्टी तिच्या आकलना पलीकडच्या होत्या...

हळू हळू ती मोठी होत होती आणि काही प्रसंग वरचे वर असे घडले की तिला कळत गेले की जी पोकळी तिला तिच्या आयुष्यात जाणवते आहे ती कसली आहे... काही तरी कमी आहे असे सतत तिला जाणवत होते ते कश्या मुळे...

इतर मित्र-मैत्रिणींच्या तोंडातून नेहमी 'आई' या शब्दाचा सतत उल्लेख ती ऐकत असे... आईने डब्यात हे दिले... आईने डब्यात ते दिले... आईने माझ्यासाठी हे बनविले...

आईजवळ झोपले तरच मला झोप येते... आई असे करते... आई तसे करते... असे सतत अबोलीच्या कानावर पडत असे.

आई हा शब्द देखील तिच्यासाठी नवीनच होता...

तिने घरी आल्यानंतर सुधाकररावांना विचारले... "बाबा, आई काय असते"

"माझ्या बाळाला हा प्रश्न कसा पडला आज " सुधाकरराव लाडाने तिला म्हणाले.

"शाळेत ना सगळे आईबद्दल बोलत असतात... पण मला माहीतच नाही ना ... मग मी बोलू शकत नाही... सांग ना रे बाबा "

सुधाकररावांना एवढया चिमुरडीला काय आणि कसे सांगावे ते कळत नव्हते... त्यांनी अबोलीला समजावले... "आई ती असते जी बाळाला जन्म देते, वाढवते"

"मग माझी आई कुठे आहे" चिमुकल्या अबोलीचा पुढचा प्रश्न.

आता मात्र सुधाकररावांना तिला काय उत्तर द्यावे आणि कश्या शब्दात समजवावे हे कळत नव्हते... तसेही आता कितीही सांगितले तरी तिच्या फार लक्षात येणार नव्हते. योग्य वेळ आल्यावर मुलींशी या विषयावर मोकळे आणि सविस्तर बोलू असा विचार करून त्यांनी विषय बदलला... "काय काय झाले सांग पाहू आज शाळेत"

अबोली देखील शाळेतील घटनाक्रम सांगू लागली आणि बोलत असलेला विषय मागे पडला... तात्पुरता विषय टाळला गेला होता खरे... पण आता हे वरचेवर होणार याची सुधाकररावांना खात्री वाटत होती... नकळत त्यांचे मन भूतकाळात शिरले.

--------------------

सुधाकररावांचा २bhk फ्लॅट होता, शांतीबन सोसायटी, डोंबिवली मध्ये... परिसर उंचच उंच इमारतींनी झाकलेला... नजर जाते तिथवर फक्त इमारती... कॉंक्रीटचे जंगलच ते जणू...

इतके दिवस ते भाड्याच्या फ्लॅट मधे राहत होते... त्यांच्या दोन्ही मुलींचा,पल्लवी आणि अबोलीचा जन्म तिथेच झाला... स्वतःचे घर हे मध्यमवर्गीय माणसाचे स्वप्नच... त्यांचे ते स्वप्न आज प्रत्यक्षात उतरले होते

वास्तुशांती जोरात केली होती त्यांनीं... सगळे जवळचे नातेवाईक. मित्र, त्यांचे बँकेतले सहकर्मचारीही आले होते.

सुधाकर रावांच्या आई-बाबांचा उर अभिमानाने भरून आला होता... आपल्या मुलाची वरचेवर होणारी प्रगती पाहून. वर्षाचे आई-बाबा आणि भाऊ आशिष तर देवाचे आभार मानत होते कि किती कर्तबगार आणि प्रामाणिक नवरा मिळाला आहे वर्षाला... नशीब काढले मुलीने...

वर्षा आणि सुधाकर रावांनीं तो फ्लॅट खूप प्रेमाने सजवला होता.

फ्लॅट दुसऱ्या मजल्यावर होता... फ्लॅट च्या दरवाज्या समोर बरीच मोकळी जागा होती... ती जिथे संपते तिथून वरच्या मजल्यावर जाण्यासाठी पायऱ्या होत्या. त्या दरवाज्या समोरील मोकळया जागेत वर्षाने आकर्षक अशी रांगोळी काढली होती... त्यात भरलेल्या सुरेख रंगांनी ती अजूनच खुलून दिसत होती... तिच्या वर मधोमध हळद-कुंकू वाहिलेले दिसत होते...

ती रांगोळी आणि दरवाज्याच्या चौकटी वर लटकणारे नारळ आणि पानांचे तोरण घरात येणाऱ्यांचे स्वागत करत होते.

हॉल मध्ये गेल्या गेल्या समोरच्या भिंतीला लागून असलेला सोफा सेट, त्याच्या समोर काचेचे टीपॉय... त्यावर ठेवलेली फुलदाणी... त्यात असलेली विविध रंग आणि आकाराची फुले, पुढे समोर दुसऱ्या बाजूच्या भिंतीला टेकून असलेले शोकेस, त्यावर मधोमध असलेला टीव्ही... डाव्या बाजूच्या काचेच्या कप्प्यात सुधाकररावांना मिळालेल्या ट्रॉफिज, उजव्या बाजूच्या कप्प्यात पल्लवी-अबोली यांची भातुकली मांडलेली होती... शोकेसच्या डाव्या

बाजूला असलेली खिडकी... तिचे आकर्षक रंगांचे पडदे... त्याच्या बाजूच्या भिंतीवर असलेले डोक्यावर घड्यामधून पाणी वाहून नेणाऱ्या बायंकाचे पेन्टिंग...

एकंदरीत हॉल मधील सगळीच मांडणी अगदी नीटनेटकी होती...

हॉलला लागूनच गॅलरी होती... तिथे नानातऱ्हेची रोपे लावलेली होती... तुळस, मोगरा, गुलाब, कोरफड, कडीपत्ता, मनीप्लांट, चिनी गुलाब आणि इतरही बरीच शोची रोपे होती... गॅलरीला जणू छोट्याश्या बागेचे स्वरूप आले होते. तिथे उभे राहिले तरी सुवासाने मन कसे प्रफुल्लित व्हायचे...

वाऱ्याबरोबर झुलताना त्या रोपांचा डौल काही औरच असायचा...

हॉलला लागून किचन होते... वर्षाची घरातील हक्काची जागा जिथे तिचा दिवसभरातील जास्तीत जास्त वेळ जात असे...

हॉलच्या डाव्या बाजूला २ बेडरूम्स होत्या

वर्षा आणि सुधाकर रावांनी त्यांचे मास्टर बेडरूमही छान सजवले होते... समोरच्या भिंतीवर मधोमध त्यांच्या लग्नाचा फोटो फ्रेम करून लावला होता... भिंतींचे रंग, बेड, वॉर्डरोब, पडदे, अगदी आकर्षक होते. खोली मध्ये वेगवेगळ्या ठिकाणी शोपीस ठेवले होते... खिडकीला

असलेली आणि प्रत्येक येणाऱ्या जाणाऱ्या वाऱ्याच्या झुळके बरोबर बेडरूमला संगीतबद्ध करणारी विंड चाईम... एक ना अनेक गोष्टी तिथे त्यांच्या प्रेमाची साक्ष देत होत्या...

दुसरे बेडरूम त्यांनी त्यांच्या चिमुरड्यांसाठी सजवले होते... तितक्याच आपुलकीने आणि प्रेमाने...

मुलींच्या बेडरुम मधे एकमेकांना समांतर असे दोन भिंतींना टेकून असलेले २ बेड्स... १ छोटे कपाट... त्यात एका बाजूला अबोलीचे तर दुसऱ्या बाजूला पल्लवीचे सामान होते. व्यवस्थित घडी घातलेले त्यांचे कपडे, खेळणी, पुस्तके, ड्रॉईंगचे साहित्य... कलर पेन्सिल्स... पोस्टर्स. भिंतींचा गुलाबी रंग... अबोलीच्या बेड जवळ मिकी माउसचे तर पल्लवीच्या बेड जवळ टॉम आणि जेरीचे चित्र काढलेले होते. वरती स्लॅबला फॅनच्या आजूबाजूला रेडियमची ग्लीटरिन्ग फुलपाखरे आणि तारका लावल्या होत्या... अंधारात ते चमचम करत असत.

अबोलीला मोठी गंमत वाटायची त्यांची... झोप लागेपर्यंत तिचे सगळे लक्ष त्यांच्याकडेच... नकळत परी प्रमाणे आसमंतात स्वच्छंद पणाने विहार करत असल्याचा भास होत असेल का तिला!

वर्षाचा सगळा वेळ घर आणि दोन्ही मुलींचे करण्यात जात असे... सुधाकरराव बँकेत मॅनेजर होते. ते सकाळी बँकेत गेले कि वर्षाचा सर्व वेळ मुलींचे करण्यात जात असे...

त्यांची आंघोळ, खाणे-पिणे, शाळेची तयारी, झोप, एक्सट्रा करिक्युलर ॲक्टिव्हिटीज... दिवस कसा संपत असे वर्षाला पण कळत नसे...

संध्याकाळी सुधाकरराव घरी आले कि दोघे एकत्र चहा घेत असत. त्यांच्या दोन चिमण्या दुडूदुडू धावत त्यांच्या जवळ येत... त्यांची चिवचिव ऐकून सुधाकरावांचा दिवसभराचा शीण कुठल्या कुठे पळून जात असे.

मग त्यांच्या बरोबर खेळण्यात... त्यांच्या मागे धावण्यात... त्यांचे बोबडे बोल ऐकण्यात सुधाकरराव मग्न होत असत. वर्षा संध्याकाळच्या स्वयंपाकची तयारी करू लागे... सगळे एकत्र हॉल मधे बसून टीव्ही पाहता पाहता जेवण करत असत...

मुलींना झोपवणे म्हणजे एक साग्रसंगीत कार्यक्रम असायचा.  कधी कधी तर वर्षा आणि सुधाकर रावांचा डोळा लागायचा पण मुली काही झोपायच्या नाहीत...

संसार कसा अगदी दृष्ट लागण्या जोगा चालला होता... नवीन फ्लॅट आता अंगवळणी पडला होता...

पण कुठे माशी शिंकली कोण जाणे ... . अलीकडे काही ना काही कारणांवरून दोघांचे सारखे खटके उडत... दोघांचाही स्वतःच्या रागावर ताबा राहत नव्हता... बऱ्याचदा

घरात अबोला असे... अर्थात ते दोघेही मुलींना तो जाणवणार नाही आणि त्यांच्या रूटीन वर कसलाही परिणाम होणार नाही याची खबरदारी घेत असत...

पाहता पाहता भांडणे इतकी विकोपाला गेली कि होत्याचे नव्हते झाले... संसार वाचवण्यासाठी काय कमी प्रयत्न केले... आपण कुठे कमी पडलो बॅलन्स करण्यात... सुधाकरराव विचारात गढून गेले होते...

"बाबा... बाबा" च्या हाकेने सुधाकरराव भानावर आले... अबोलीला भूक लागली होती... सुधाकरराव तिला घेऊन किचन मध्ये शिरले

*प्रकरण २*

अबोली आणि पल्लवी दोघी आता हळू हळू मोठ्या होत होत्या... जसजशी समज वाढत होती तसतसे त्यांच्या मनातील प्रश्नही वाढत होते

अबोलीला नेहमी प्रश्न पडत असे की मीच का आईच्या छात्रछायेच्या सुखापासून वंचित... पण उत्तर कधी मिळत नसे... हळूहळू जशी ती मोठी होऊ लागली तसे तिचे प्रश्न जास्तच वाढत गेले... हळूहळू तिच्या लक्षात येत गेले की तिचे आई-वडील ती ५ वर्षांची असतानाच विभक्त झाले. तेव्हापासून ती आणि पल्लवी त्यांच्या बाबांबरोबर राहत आहेत.

सुधाकर रावांनी आईची कुठलीही कमी भासू न देता त्या दोघींना लाडाने वाढविले होते. सुधाकररावच सर्व कुटुंबाची धुरा सांभाळायचे. स्वयंपाक... त्यांना शाळेसाठी तयार करणे... त्यांचे टीफीन... त्यांचा अभ्यास... त्यांची आजारपणे... दुखणे-खुपणे... अगदी सर्वच. मुली शाळेत गेल्यावर ते स्वतःचे आवरून बँकेत जायचे. असा त्यांचा दिनक्रम असे.

सुट्टीच्या दिवशी मुलींना बागेत घेऊन जाणे... त्यांना शॉपिंगला, सर्कस पाहायला, ऐतिहासिक वारसा समजावा या हेतूने गड-किल्ले भ्रमंती... अश्या प्रकारे ते त्यांच्या मुलींना सर्व सुखसोयी उपलब्ध करून देण्यासाठी एकहाती झगडत होते.

पल्लवी, अबोलीहून दोन वर्षांनी मोठी होती. दोघी बहिणी एकमेकीना अगदी जीव लावीत होत्या. एकीचे दुसरीवाचून पान हालत नसे.

पल्लवी बऱ्यापैकी आता घराची जबाबदारी उचलण्यात सुधाकररावांना मदत करत असे...

पल्लवी खूप समजूतदार होती... लहान वयातच आईची छत्रछाया हरवल्यामुळे तिला लहान वयातच बऱ्याच गोष्टींना सामोरे जावे लागले. जरी सुधाकर रावांनी कुठलीही कमी भासू दिली नव्हती तरीही ती लहान वयातच मोठी आणि जबाबदार मुलगी झाली होती. तिला कळत असल्यामुळे आता आईचे आपल्या आयुष्यात नसणे हि गोष्ट तिने स्वीकारली होती.

पण अबोलीचे तसे नव्हते. अबोलीच्या मनात वरचे वर नाना तऱ्हेचे प्रश्न भोवतालचे प्रसंग उभे करत असत. तिला कसलेच उत्तर मिळत नसे. मग ते प्रश्न पल्लवीच्या वाट्याला येत असत. बऱ्याचश्या प्रश्नांची उत्तरे पल्लवीकडे पण नसत. पण काही करून ती अबोलीची समजूत काढण्याचा... तिच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रयत्न करत असे. चिमुकल्या अबोलीचे तेवढ्या पुरते समाधान होत असे.

अबोलीला गायनाची आवड होती. तिचा गळाही गोड होता. सुधाकर रावांनी तिला प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित मंगेश जोशी यांच्या शास्त्रीय संगीत विद्यालया मधे गाण्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण मिळावे या हेतूने दाखल केले होते. शनिवार-रविवार तिचा गायनाचा क्लास असे. तिला मनापासून आवड असल्या कारणाने ती गाताना अगदी हरवून जात असे.

सुरुवातीला थोडे दिवस सुधाकररावांना तिला रीयाझासाठी सकाळी उठवावे लागे. पण नंतर जसजशी तिची त्या मधली गोडी वाढत गेली तसतसे ती स्वतःहूनच रियाझावर जास्त लक्ष देऊ लागली. त्या दिवसा नंतर तिने तो आपल्या रूटीन चा भाग बनवला होता.

असेच दिवसा मागून दिवस जात होते... दोघी बहिणी मोठ्या होत होत्या...

पल्लवी बारावीत तर अबोली दहावीत होती. अबोली सरस्वती विद्या मंदिर मधे तर पल्लवी सरस्वती जुनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स मधे

दोघी बहिणी जोमाने अभ्यास करत होत्या... ग्रुप स्टडी... रात्रीचे जागरण... कसलीच कसर बाकी ठेवत नव्हत्या... त्यांची रूम वेगळी असल्या कारणाने सुधाकररावांना त्यांच्या जागरणाचा कधी त्रास झाला नाही...

परीक्षा संपली आणि दोघीही चांगल्या मार्कांनी पास झाल्या. सुधाकररावांचा आनंद गगनात मावत नव्हता जेव्हा मुली पेढे घेऊन आल्या होत्या.

पल्लवीने एंट्रन्स एक्जाम दिली आणि तिला मुंबई मधेच कॉम्पुटर इंजिनियरिंगला ॲडमिशन मिळाली.

अबोलीने सरस्वती जुनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स ११ला ॲडमिशन घेतली…

सुट्टीचा दिवस होता आणि दोघी बहिणी मिळून घर आवरत होत्या… त्यांची खोली आवरून झाली… त्यानंतर आता त्या सुधाकररावांची खोली आवरत होत्या… त्यांचे कपाट आवरत असताना त्यांना कपाटाच्या वरच्या कप्प्यातून कशाचा तरी कोपरा बाहेर आलेला दिसला… पल्लवी तो मागे सरकवत असताना तो आणि त्याच्या आजूबाजूच्या वस्तू वरून खाली पडल्या…

अबोली त्या वस्तू उचलत होती… पल्लवी देखील तिला मदत करायला खाली झुकली आणि तिची नजर त्या पडलेल्या अल्बम कडे गेली… बरीच धूळ बसलेली होती त्या वर… पल्लवीने हाथ फिरवून धूळ बाजूला केली… बघावे कि नको असा विचार करत त्या दोघी तो पाहू लागल्या… पाहण्यात कधी पूर्ण गढून गेल्या ते त्यांना कळलेच नाही…

पहिले पान उलटले… तिथे सुधाकररावांचा फोटो मध्ये वेड्स लिहिले होते आणि खाली वर्षाचा फोटो होता… सुधाकराव आणि वर्षाच्या लग्नाचा अल्बम होता तो…

अबोली आणि पल्लवी बघतच राहिल्या… खूप वेळ त्या वर्षाच्या फोटोकडे निरखून बघत होत्या…

हळूहळू एकेक फोटो बघत असताना त्यांना त्यांच्या आई-बाबांचा लग्न सोहळा आपल्या डोळया समोरच घडत असल्याचा भास होत होता. तो पाहण्यात दोघीही गढून गेल्या... दोघींच्याही डोळयांच्या कडा त्यांच्या नकळत ओलावल्या होत्या... पल्लवी च्या आधी ते लक्षात आले... पल्लवीने अबोलीची अश्रू पुसले.

"पल्लवी... ए पल्लवी... जरा पाणी आण प्यायला" हाक ऐकू आली. सुधाकरराव घरी आले होते... पल्लवीने तो अल्बम तसाच होता तिथे ठेवला आणि अबोलीला खोली आवरून ठेव सांगून ती किचन कडे पाणी आणण्यासाठी गेली.

पाहता पाहता दोन वर्षे सरली. अबोली पण बारावी पास झाली आणि तिने इंजिनियरिंगला ॲडमिशन घेतली. गायनाच्या परीक्षा देऊन एव्हाना अबोली त्यात पारंगत... निपुण झाली होती. तिचा रियाझही नेहमी प्रमाणे चालू होता.

तिला आज तिचे गुरुजी मंगेश जोशी... यांच्या बरोबर... कार्यक्रमात गाण्याची संधी मिळाली होती. गुरुजी त्यांच्या सर्वोत्तम १० विद्यार्थ्यांना आपल्या बरोबर कार्यक्रमात गाण्याची संधी देत असत. अबोलीचाही त्यांचात समावेश होता.

लाईव्ह कार्यक्रमासाठी शिवाजी रंगमंदिराच्या पटांगणावर मोठे व्यासपीठ उभे केले होते

अबोलीचा आज पहिला लाईव्ह कार्यक्रम होता म्हणून ती खूप नरवस होती. पल्लवीने तिला धीर दिला होता. सुधाकर रावांचे आशीर्वादही होते च तिच्या पाठीशी. तिच्या गळयातील गोडवाच असा होता कि त्याने रसिक श्रोत्यांच्या मनाला मोहिनी नाही घातली तरच नवल होते.

कार्यक्रमाला सुरुवात झाली. गुरुजींनी सरस्वतीमातेला वंदन करून कार्यक्रमाला सुरुवात केली. सरस्वती वंदने नंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. इतर २ मुलेही त्यांना साथ देऊ लागली. तिथले वातावरण स्वर लहरींनी पालटून गेले होते.

आता अबोली आणि इतर दोन मुली गायनास प्रारंभ करणार होत्या. अबोलीने समोर नजर टाकली तर प्रेक्षकांचा उसळलेला उत्साह दिसला... तिला परत नरवस वाटू लागले... तिच्या मनात नानातऱ्हेचे विचार घोळू लागले... "गुरुजींनी सेट केलेली पातळी माझ्यामुळे ढासळता कामा नये... आय हॅव टू गिव्ह माय बेस्ट... गुरुजींचा विश्वास सार्थ ठरवायला हवा आपण " अबोली विचार चक्रातुन बाहेर आली... भानावर येऊन तिने मनोमन सरस्वती मातेला आणि गणपती बाप्पाला नमन केले...

अबोलीने दोन्ही हातांची बोटे अनुक्रमे कानांना लावली... गुरुजींना नमस्कार करून तिने गायला सुरुवात केली. आधी व्यवस्थित षड्ज वगैरे लावून झाल्यावर तिने अशी काही तान घेतली कि तिच्या गळयातील गोडव्याने आसमंत मंत्रमुग्ध होऊन गेला. श्रोत्यांना पार मोहिनी घातली होती. कार्यक्रम संपला तरी श्रोते उठण्यास तयार नव्हते. अश्या रीतीने अबोलीच्या गायन कलेचा प्रवास नव्या उंचीवर पोहोचला होता.

कार्यक्रमानंतर अबोलीने गुरुजींना परत नमस्कार केला. गुरुजींनी काहीही न बोलता फक्त तिच्या डोक्यावर हात ठेऊन आशीर्वाद दिला... त्यांच्या डोळयात त्यांना अबोलीबद्दल वाटणारा अभिमान स्पष्ट दिसत होता.

सुधाकरराव आणि पल्लवी चा आनंद तर शब्दात वर्णन करणे केवळ अशक्य.

**********************************************************************

*प्रकरण ३*

पल्लवी इंजिनियरिंग चांगल्या परसेंटने पास झाली. तिला एव्हाना आपल्या आयुष्यात सलत असलेल्या पोकळी चा विसर पडला होता.

अबोली आणि पल्लवी आज सकाळीच मूव्ही पाहायला बाहेर पडल्या होत्या... अकराचा शो होता सिटीप्लेक्स मधे.

मूव्ही नंतर त्या शॉपिंग करण्यासाठी मॉल मधे फिरत होत्या. त्या खूपच आनंदी होत्या... आज खूप दिवसांनी भटकायला मोकळा वेळ मिळाला होता. मॉल मधे दोघीही कुठे जायचे याचे डिस्कशन करत होत्या... ते करत करत च त्या दोघी एस्कलेटर वर चढल्या आणि कपड्यांच्या शॉप मधे शिरल्या...

अबोलीला कधीही कुठलीच गोष्ट लवकर पसंत पडत नसे... म्हणून तिचे शॉपिंग म्हणजे पल्लवीसाठी एक सोहळाच असायचा... पल्लवीचे मात्र तसे नव्हते... तिच्या डोक्यात क्लिअर असायचे कि तिला काय घ्यायचे, कश्या प्रकारचे घ्यायचे आणि काय रेन्ज मधे घ्यायचे.

टॉप्स आणि टी-शर्ट्स पाहणे चालू होते. अबोली ते ट्रायल रूम मधे घेऊन जात होती... बाहेर येत होती... परत मनाजोगे काही ना मिळाल्याने परत इतर कपडे पाहत होती. पल्लवीला आवाज देऊन ते कसे वाटत आहेत हे विचारत होती... बऱ्याच वेळाने फायनली अबोलीला २ टॉप्स आवडले. पल्लवीने पेमेंट केले आणि त्या तिथून निघाल्या.

पल्लवीला कुर्तीज बघायच्या होत्या. म्हणून त्या दोघी इकडे तिकडे शॉप शोधत फिरत होत्या. दोघींचे लक्ष शॉप्सकडे होते. तेवढ्यात अबोली समोर असलेल्या बाईंना जाऊन धडकली... त्या बाईंच्या हातातील पर्स खाली पडली "ओह, आय एम एक्सट्रीमली सॉरी" असे अबोली म्हणत असतानांच तिने वर पाहिले...

समोर एक मध्यम वयाच्या बाई उभ्या होत्या... गोरा रंग, मोठे डोळे, धारदार नाक... अंगाभोवती चापून चोपून नेसलेली जांभळया रंगाची सिल्क साडी, गळयात मंगळसूत्र, कपाळावर मध्यम आकाराची टिकली, केसांची घातलेली वेणी... खांद्यावर अडकवलेली पर्स जी आता अबोलीच्या धक्क्याने खाली पडली होती.

वर्षा पर्स मधून काहीतरी काढत होती... तेवढ्यातच ती पर्स समोरच्या मुलीच्या धक्क्याने खाली पडली होती. अबोली खाली वाकून त्यांना सर्व सामान भरण्यास मदत करत होती... तेवढ्यात मागून आवाज ऐकू आला... "वर्षा... अगं कुठे राहिली आहेस... मी तुला... "

आशिष समोर पाहून बोलता बोलतच थबकला...

तेवढ्यात पल्लवीही तिथे आली... अबोली एवढ्या वेळ न दिसल्याने ती खूप काळजीत वाटत होती...

पल्लवीने ओळखले होते... “आशिषमामा” ला... त्या आशिष च्या कॉंटॅक्ट मधे होत्याच. आशिषलाही त्या दोघींना बऱ्याच दिवसांनी पाहून खूप आनंद झाला. आशिषने त्यांची खुशाली विचारली. “अबोली... पल्लवी कश्या आहात?” अबोलीच्या गायनाच्या कार्यक्रमाबद्दल... पल्लवीला अभ्यासबद्दल. सुधाकर रावांबद्दल... सगळी चौकशी केली आशिषने.

आशिषने त्यांची नावे घेतल्यामुळे वर्षाला अंदाज आला होता कि त्या कोण आहेत. वर्षा म्हणजे आशिषची बहिण जी आता त्याच्या बरोबर उभी राहून त्यांचे संभाषण ऐकत होती. त्याने वेळोवेळी वर्षाच्या कानावर मुलींच्या गोष्टी घातल्या होत्या...

वर्षा – दोघींची आई - त्यांना तब्बल तेरा-चौदा वर्षांनी पाहत होती. वर्षाच्या हृदयात चलबिचल सुरु झाली होती. आपण सोडून आलेल्या कळयांची उमलून फुले झाली आहेत. आपण त्यांच्या बरोबर त्यांच्या उमलण्याच्या काळात नव्हतो याची खंतही तिला वाटली.

आशिषने अबोली आणि पल्लवीला... वर्षाकडे इशारा करून. "हिला ओळखले का" असा प्रश्न नजरेतून केला. वर्षाचा फोटो अबोली आणि पल्लवीने घरातले जुने अल्बम्स चाळत असताना पाहिला होता... त्यांच्या हळूहळू लक्षात आले. त्यांच्या चेहऱ्यावरचे हाव-भाव हळूहळू पालटू लागले आणि तिथे निःशब्द शांतता पसरली. ऑकवर्डनेस भरून गेला सर्व वातावरणात. आपल्या आईच्या ह्या आकस्मित भेटीने त्या बावरून गोंधळून गेल्या होत्या... काय नि कसे रिॲक्ट करावे काही सुचत नव्हते.

त्यांच्या आईच्या डोळयात मात्र वात्सल्य उचंबळून आले होते. ती त्या दोघींना डोळे भरून पाहू लागली...

पल्लवीने राणी रंगाचा ड्रेस घातला होता... त्यावर हिरवा दुपट्टा... मोकळे सोडलेले लांब केस... बॉक्स हिल्सची चप्पल... कानात मॅचिंग झुलते कानातले... चेहऱ्याचा गोरापान रंग... ते चेहऱ्यावरचे तेज आणि कपाळावर मधोमध लावलेली अगदी छोटी आणि खूप निरखून बघितल्यावर दिसणारी राणी रंगाची खड्याची टिकली...

अबोलीने ब्लू जीन्स आणि वरती पांढऱ्या रंगाचा स्लिव्हलेस टॉप घातला होता, तिचे शोल्डर लेंथ केस, फ्लॅट चप्पल घालूनही ती पल्लवी पेक्षा उंच दिसत होती... थोडा गव्हाळ रंग... टॉपला मॅचिंग कानातले...

वर्षाच्या मनात त्यांच्याशी बोलण्याची तीव्र ईच्छा निर्माण झाली... ती त्यांच्याशी संवाद साधण्याच्या प्रयत्नात आहे हे त्या दोघी बहिणींना जाणवले... त्यांना बोलावे कि न बोलावे... काय नि कसे बोलावे... काही सुचेना... त्याच तगमगीत त्या दोघी ... पुढे काहीही न बोलता... आशिषचा निरोप घेऊन... तेथून निघून घरी आल्या. त्या दोघी बहिणींची अनोळखी व्यक्तीला भेटल्या प्रमाणे ऑकवर्ड अशी रिॲकशन होती... तो प्रसंग शब्दांत मांडणे केवळ अशक्य.

घरी आल्यावर थोडे चित्त थाऱ्यावर आल्यावर त्यांच्या सगळा प्रसंग डोळया समोरून गेला आणि जन्मदात्या आईला पाहून आपली अशी रिॲकशन का व्हावी याचा दोघीही विचार करू लागल्या. तो मनाचा गोंधळ... ती कालवा- कालव... समजण्या पलीकडची होती.

अबोलीला तर कळत नसलेल्या वयापासूनच आईचा सहवास मिळाला नसल्या कारणाने तिची अटॅचमेंट नसणे स्वाभाविक होते.

पल्लवी समजूतदार असल्या कारणाने तिला कळून चुकले कि तिचा सहवास न लाभल्यामुळे... तिच्याशी कसलीही अटॅचमेंट... आपुलकी... आपल्याला वाटली नाही. सगळा प्रसंग दोघींच्या डोळया समोरून जात होता. तितक्यात दरवाजाची बेल वाजली. सुधाकरराव घरी आले होते...

सुधाकरराव फ्रेश होऊन हॉल मधे येऊन बसले. पल्लवीने त्यांना चहा करून दिला. ते थोडे निवांत झाल्यावरच तिने विषयाला हात घातला.

तिने घडलेली सगळी हकिक़त वर्णन केली. आशिष आणि वर्षाची भेट... त्यांची रिॲक्शन... तो ऑकवर्डनेस... त्यांचे तिच्याशी न बोलता घरी निघून येणे.

सुधाकररावांना त्यांच्या रिॲक्शनचे आश्चर्य वाटले नाही. लहानपणापासून नावापुरता सहवास मिळाला होता या दोघींना त्यांच्या आईचा. त्यांच्या मनात तिच्याबद्दल अटॅचमेंट कुठून येणार. पण ती बोलायच्या तयारीत असताना तुम्ही निघून येणे हे बरोबर नाही असे देखील त्यांनी मुलीना सांगितले. अर्थात त्यांनी हे मुद्दाम केले नाही आणि गहिवरल्यामुळे घडले असणार हे देखील त्यांच्या ध्यानात आले होते.

अबोली आणि पल्लवी आता सुधाकररावांना विचारणार होत्या... तिचे घर सोडून जाण्याचे कारण...

अबोली पल्लवीला कोपराने खुणावत होती कि तू विषय काढ बाबांसमोर... पल्लवीने नेहमीप्रमाणेच समजूतदार पणानेच विषयाला हात घातला...

सुधाकररावांना आता मुलींशी मोकळेपणाने बोलण्याची वेळ आली असल्याचे जाणवले. लहानपणी अबोलीने आई विषयी असंख्य प्रश्न विचारले असताना आपण त्या वेळी हा विषय मुली लहान असल्यामुळे टाळला होता...

सुधाकर रावांनी दोघीना सांगायला सुरुवात केली... कशे त्यांचे लहान लहान गोष्टीवर खटके उडत होते... आणि एकंदरीतच एकमेकांशी पटत नसल्या कारणाने आणि भांडणे शिगेला पोहोचल्यामुळे आम्हाला हा निर्णय घ्यावा लागला... डिव्होर्स इज नॉट अन इझी डिसिझन टू अराइव्ह अट...

मी प्रयत्न केला होता कि आऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट करून तुमच्या आईला घरी आणावे... पण ते काही झाले नाही...

रात्रीचे जेवण आटपून सगळे झोपायला गेले.

अबोलीचा काही केल्या डोळा लागेना. ज्या प्रश्नांचा हळूहळू पल्लवीच्या संगतीत आणि सांत्वनाने... तिला विसर पडला होता ते प्रश्न परत डोक्यात थैमान घालू लागले होते. अगदी डोके फुटण्याची वेळ आली होती.

अश्या प्रसंगी तिला कुठल्याश्या कवितेच्या ओळी आठवत होत्या...

“आभाळ आले भरुनी, शोधू कसे मी कोणाला... लाटेत वाहून गेला, सगळाच माझा किनारा”

थोडा विचारांचा ओघ ओसरल्यावर... तिने शेजारी पाहिले तर पल्लवीचा केव्हाच डोळा लागला होता. विचार करत करत खूप उशिरा कधी तरी तिचाही डोळा लागला.

*प्रकरण ४*

पल्लवीचे इंटरव्ह्यू सुरु होते... एका आय. टी. कंपनीमधून तिला कॉल आला होता... पहिला टेलिफोनिक राऊंड पार पडला होता... पुढच्या राऊंड्ससाठी तिला पुण्याला बोलवले होते पुढच्या शुक्रवारी...

पल्लवीची जोरदार तयारी झाली होती... ती इंटरव्ह्यूसाठी पुण्याला गेली... .

तिथे तिचे इंटरव्ह्यूचे आणखी तीन राऊंड  झाले... दोन टेकनिकल आणि एक एच आर राऊंड...

इंटरव्ह्यू देऊन ती मुंबईला परत आली... सेलेक्टड कॅन्डिडेट्स ना कंपनीकडून फॉर्मल ई-मेल येणार होते विथ अपॉइंटमेंट लेटर अँड जॉइनिंग डेट...

पंधरा दिवसांनी पल्लवीला कंपनीकडून फॉर्मल ई-मेल आले... तिची मेहनत सफल झाली होती...

अपॉइंटमेंट लेटरची प्रिंट-आऊट काढून ती सुधाकररावांची वाट पाहू लागली... कधी एकदा बाबा येतात आणि त्यांना ही बातमी देते असे झाले होते पल्लवीला...

सुधाकरराव आणि अबोलीचा आनंद गगनात मावत नव्हता... पण पल्लवी आपल्यापासून दूर पुण्याला जाणार याचे मात्र तिला खूप वाईट वाटत होते... तिचे पल्लवी शिवाय पण हालत नसे... पण या मनातील विचारला मागे सारत ती पल्लवी च्या आनंदात सहभागी झाली...

पल्लवीला आता राहायची सोय पाहायची होती पुण्यात... पुणे तसे नवीनच होते तिच्यासाठी... त्यांचे कोणी नातेवाईकहि पुण्यात नव्हते, सर्वच मुंबई मध्ये होते...

अबोलीने पल्लवीला तिच्या मैत्रिणीचा, रेवतीचा फ्लॅट पुण्यात असल्याचे सांगितले आणि रेवतीने पल्लवी राहणार म्हटल्यावर आनंदाने होकार दिला... रेवतीचा फ्लॅट वाकडमध्येच... पल्लवीच्या कंपनीपासून जवळच होता... पण रेंट देणार असल्याचे आणि व्यवहार हा व्यवहाराच्या जागी आणि पर्सनल रिलेशन्स त्यांच्या जागी... असे रेवतीला सांगूनच ती तिच्या फ्लॅट मध्ये राहायला तयार झाली... चला रहायचा मोठा प्रश्न सुटला होता...

सुधाकरराव पल्लवीला पुण्याला सोडून... तिची राहायची, खाण्या-पिण्याची सोय पाहूनच ते मुंबईला परतले... त्यांच्या काळजाचा तुकडा त्यांच्यापासून दूर राहणार होता... पण मुलींच्या यशात, भरभराटी मधेच आपली भरभराट आहे याची त्यांना कल्पना होती... . त्यांनी दुसरे लग्न न करता मुलींच्या संगोपनातच आपले आयुष्य वेचले होते...

नवीन जॉइनीसचे ट्रैनिंग चालू झाले तिचे... ते तीन दिवस चालले होते... त्यामध्ये कंपनीबद्दलची माहिती, आय. टी. क्षेत्राबद्दलची माहिती, कॉर्पोरेट एथिकस, एटीकेट्स, न्यू जॉइनीसचे इंट्रोडकशन... .

प्रोजेक्ट ऑलोकेशन झाले आणि ती जॉब मध्ये हळू हळू रुळत होती...

अबोली आता फायनल इयर बी ई ची तयारी करत होती... पुढच्या महिन्यातच एक्साम होती...

तिची जोरदार तयारी सुरु होती... कधी तिच्या घरी... कधी रेवतीच्या घरी... ग्रुप स्टडीज... लायब्ररी... नोट्स घेणे... ग्रुप मध्ये शेअर करणे... सगळीच  एक्सामची गडबड...

पेपर छान गेले सगळे... एक्साम संपली  सुट्टी सुरु झाली...

अबोली, रेवती आणि ग्रुप आता ट्रिप प्लॅन करत होते... पुणे दर्शन... पुणे दर्शन ठरले शेवटी...  शॉर्ट अँड स्वीट ट्रिप होऊन जाईल असा सर्वांचा विचार झाला...

सुधाकररावांनीही काही विरोध  केला नाही... कारण तिचा नेहमीचा ग्रुप बरोबर होता... म्हणून ते निर्धास्त होते...

पहाटे ६ला गजर झाला... अबोली उठून तयार होऊन बसली... ती तयार होई पर्यंत सुधाकररावांनी तिच्यासाठी चहा टाकला...

दोन दिवस पुण्यात मुक्काम होता... त्यानुसार तिने सर्व तयारी केली होती... ती तयार होऊन चहा पीत पीत वाट पाहू लागली... बाहेर गाडी चा हॉर्न वाजला, अबोलीने खिडकीतून डोकावून पाहिले... तिला रेवती आणि तिच्या इतर फ्रेंड्स दिसल्या...

तिने चहा चा शेवटचा घोट गडबडीत घेतला... सुधाकररावांच्या पाया पडली... बॅग घेतली आणि निघाली ती ... अबोली बसताच सर्वानी गणपती बाप्पा मोरया असा गजर केला आणि गाडी पुण्याच्या दिशेने निघाली...

गाडी नजरेआड होईपर्यंत सुधाकरराव तिथेच उभे होते...

गाडीने मुंबईची वेस ओलांडली होती एव्हाना...  सर्व मैत्रिणी गाण्याच्या भेंड्या खेळत होत्या... मधेच कोणाला तरी भूक लागत होती... डबे उघडून खाणे चालू होते अधे-मधे... मधेच खड्ड्यामुळे सगळे इकडे- तिकडे लोटले जात होते... एकंदरीत प्रवास मजेत चालू होता...

पुण्यनगरीत प्रवेश करताच प्रवासाचा क्षीण कुठल्या कुठे पळून गेला...

पल्लवी राहत असलेल्या रेवतीच्या फ्लॅट वर गाडी घेतली डायरेक्ट...

शनिवार असल्यामुळे पल्लवीला सुट्टी होती ऑफिसला ... तिने दार उघडले... तिला पाहताच अबोलीने तिला घट्ट मिठी मारली...

बॅग्स खाली ठेवल्या... फ्रेश व्हायचे होते सर्वांना... एकेक करून सर्वांनी आंघोळ केली... छान कपडे घालून... छान तयार होऊन निघाल्या पुण्यनगरीच्या दर्शनसाठी ... त्यांना थोडाही वेळ वाया घालवायचा नव्हता...

सर्वजणी गाडीमध्ये येऊन बसल्या... ड्राइवर काकांना गाडी ठरल्या प्रमाणे घ्यायला सांगितली...

आधी दगडूशेठचे दर्शन घेणार होत्या त्या... तिथे गेल्या पण आज सुट्टीचा दिवस असल्या कारणाने रांगच रांग लागली होती दर्शनसाठी... तब्बल दीड तास त्या सर्वजणी रांगेत उभ्या होत्या... फायनली दीड तासाने त्यांना दर्शन झाले दगडूशेठ गणपती चे... ती भव्य मूर्ती सर्वजणी डोळे भरून पाहून घेत होत्या... सर्वांना खूप छान वाटले... प्रसाद घेतला आणि सर्वजणी निघाल्या...

आता त्यांचे  डेस्टिनेशन होते शनिवारवाडा... संध्याकाळ झाली च होती... दगडूशेठ ते शनिवारवाडा पायींच जायचे ठरले...

चालत चालत त्या लाल महाल चौकात आल्या... तिथे पेशवे गणपतीचे त्यांनी दर्शन घेतले... लाल महालाकडे लक्ष गेले आणि त्या पाहत तिथेच थबकल्या...  मागून गाड़ीचा हॉर्न वाजला आणि त्या भानावर आल्या... परत त्या शनिवारवाड्याच्या दिशेने चालू लागल्या...

फायनली त्यांनीं शनिवारवाड्यामध्ये प्रवेश केला.. आणि त्याचे ऐतिहासिक पेशवेकालीन सौन्दर्य पाहण्यात सगळया मग्न होऊन गेल्या..  बाजीराव पेशवे, मस्तानी, काशीबाई यांची आठवण झाल्या शिवाय राहिली नाही त्यांना..

शनिवारवाड्यात संध्याकाळचा लाइट अँड साऊंड शो सुरु झाला... तो पाहून अबोली आणि मैत्रिणी थक्क झाल्या...

कोणीच कोणाशी बोलत नव्हते...

सगळे आपापल्या परीने इतिहासाशी संवाद साधत बसल्या सारखे वाटत होते... त्यांना खूपच छान वाटत होते... थोडावेळ बसून त्या बाहेर पडल्या ...

तिथून त्यांनी कसबा गणपतीचे दर्शन घेतले, नंतर लाल महाल... . लाल महालातही त्यांना इतिहासाची आठवण झाल्या शिवाय राहिली नाही... अश्या प्रकारे पहिला दिवस छान गेला...

पूर्ण वाडा फिरून झाला आणि त्या सर्वजणी बाहेरच्या कट्ट्यावर येऊन बसल्या...

आता त्यांना भूक लागायला सुरुवात झाली होती... एखादे चांगले हॉटेल पाहून जेवायचे असे ठरले... गाडी आली आणि त्या सर्वजणी जे एम रोडला गेल्या... जेवण करून त्या रेवतीच्या फ़्लॅटवर परत आल्या... आता मात्र सर्वांना प्रवासाचा... दिवस भर केलेल्या पायपिटीचा क्षीण जाणवू लागला होता...

कोणाचे पाय... कोणाचे हात ... कोणाचे गुडघे... कोणाचे डोके दुखत होते... सगळयांचा कधी डोळा लागलं ते कळले पण नाही...

पल्लवी आणि अबोली मात्र बराच वेळ गप्पा मारत बसल्या होत्या...

सकाळी ड्राइवर काकांचा फोन आला रेवतीला... तिने सर्वांना उठविले... सगळया तयार झाल्या आणि गाडीत बसून निघाल्या पुढच्या पुणे दर्शनासाठी...

सारस बाग, तळ्यातला गणपती, ओंकारेश्वर, केळकर म्युसिअम, चतुर्श्रुंगी, महात्मा गांधी म्युझिअम, कॅम्प, पुणे विद्यापीठ...

छान झाले एकंदरीत पुणे दर्शन...

उद्या सकाळी मुंबईला परत निघायचे होते... सगळ्या जेवून झोपी गेल्या...

अबोलीला जाग आली सकाळी सकाळी... तिला आता घरची, बाबांची खूपच आठवण येत होती... ती तयार झाली आणि सर्वांना उठविले... सगळयांनी आपापले सामान आवरले... ऑल सेट टू लिव्ह पुणे...

ड्राइव्हरकाकांनी गाडीचा हॉर्न वाजवला... सर्वांनी तो फ्लॅट डोळे भरून पहिला... दोनच दिवस राहिल्या पण ती जागाही त्यांना आपलीशी वाटू लागली होती...

पल्लवीला बाय करून सर्व मुंबईसाठी निघाल्या...

निघताना त्यांनी जंगली महाराज मंदिराला भेट दिली. आणि त्या निघाल्या... निघताना अबोलीने सुधाकररावांना कॉल करून मुंबई कडे रवाना होत असल्याचे कळविले...

ते पुण्यातून निघाले... आणि एका सिग्नलला एका गाडीने जोरात कट मारून ओव्हरटेक केले डाव्या बाजूने... रेवतीने जोरात आवाज दिला आणि ती गाडी थांबली...

ती व्यक्ती गाडीतून उतरली आणि ड्राइवर काकांशी वाद घालू लागली... अबोली आणि रेवती खाली उतरल्या... आणि आधी काकांना गाडी बाजूला घ्यायला सांगितली कारण मागे विनाकारण गाडयांची रांग लागली होती...

ती व्यक्ती अबोलीकडे पाहतच राहिली... रेवतीने त्याच्या डोळया समोर चुटकी वाजवून "ओय मिस्टर" करून त्याला भानावर आणले... “सॉरी म्हणा आधी” म्हणाली... “तुम्ही चुकीच्या बाजूने ओव्हरटेक केले होते...” एवढा वेळ तावातावाने वाद घालणारी ती व्यक्ती आता अबोलीचे सौंदर्य पाहून इतकी आवाक् झाली की चक्क सॉरी म्हणाली... गाडीचे नुकसान नाही ना झाले काय अशी विचारणा केली... ड्राइवर काकांनी गाडी चेक करून नकारार्थी मान हलवल्यानंतरच सॉरी वन्स अगेन म्हणून ती व्यक्ती गाडीमध्ये बसून निघून गेली...

अबोली पूर्ण प्रवासात त्याचाच विचार करत होती...

गाडी थांबली... सुधाकरराव दरवाजातच उभे होते... अबोलीला दोन दिवसांनी पाहून खूप बरे वाटत होते त्यांना...

अबोलीने बॅग ठेवली ... फ्रेश झाली... सुधाकररावांनी तिच्यासाठी चहा केला... तो पिऊन तिला फार छान वाटत होते...

मग तिने त्यांना सर्व किस्से, गमती-जमती सांगायाला सुरुवात केली... पण ॲक्सिडेन्टचा तो प्रसंग तिने सांगणायचे टाळले होते... तसे पाहिले तर काहींचे झाले नव्हते सो त्यांना सांगून कशाला टेन्शन द्यायचे असा विचार करून अबोलीने त्याचा उल्लेख टाळला...

हळूहळू दिवस चालले होते ... रिझल्टचा दिवस जवळ येत होता...

रीझल्ट लागला... अबोली आणि तिचा पूर्ण ग्रुप पास झाला होता ... बीई झाला...

********************************************************************

*प्रकरण ५*

पल्लवी जॉब मध्ये चांगली सेटल झाली होती पुण्यात... ती विकएन्ड्सना, सणासुदीच्या सुट्ट्यांमध्ये मुंबईला येत असे...

सध्याही ती आली होती... ती आणि सुधाकरराव हॉल मध्ये सोफ्यावर बसून टीव्ही पाहत बोलण्यात मग्न होते...

आता पल्लवी जॉबला लागून दोन वर्षे पूर्ण झाली होती. सुधाकररावही बदलत्या काळाची दिशा ओळखणारे होते. म्हणून त्यांनी पल्लवीला कोणी आवडतो का याची चौकशी केली. पण तिचे नकारार्थी उत्तर मिळाले. मगच त्यांनी तिच्यासाठी स्थळे बघयला सुरुवात केली होती.

पल्लवी दिसायलाही छान होती. ती अतिशय सुगरण आणि पदरी सामंजस्य बाळगणारी आणि वागण्यावर योग्य नियंत्रण असणारी होती. त्यामुळे तिला कोणी नाही म्हणण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.

एक छान स्थळ मध्यास्थांकडून सांगून आले. मुलगा MBA झाला होता. त्याचे नाव अक्षय जोशी. त्याला व त्याच्या परिवाराला सुधाकर रावांनी घरी बोलावले.

डीझायनर मॅजेन्टा कलरची साडी... साडीची गोल्डन बॉर्डर... मॅचिंग अक्सेसरीज... नेकलेस, इअर रिंग्स... डाव्या हातात घडयाळ... उजव्या हातात गोल्डन ब्रेसलेट... मोकळे सोडलेले लांबसडक केस... चेहऱ्यावर लाईट मेकअप... तिच्या परफ्यूम चा सुगंध... सगळे कसे अगदी भुरळ पाडणारे... एकंदरीतच छान तयार होऊन बसली होती पल्लवी...

सुधाकररावांनी अबोलीला आवाज दिला तशी अबोली घेऊन बाहेर हॉल मध्ये आली... हृदयाची धडधड वाढल्याचे पल्लवीला जाणवत होते...

तिने अक्षयच्या आई-बाबांना नमस्कार केला... आणि अक्षय कडे चोरटा कटाक्ष टाकला आणि ती सुधाकररावांच्या शेजारी येऊन बसली...

अक्षय आणि त्याच्या आई-बाबांनी प्रश्न विचारण्यास सुरुवात केली... शिक्षण, जॉब, स्वयंपाक, छंद, आवड... पल्लवीने सर्व प्रश्नांची व्यवस्थित उत्तरे दिली... अक्षयला तर तिचे बोलणे कधी थांबूच नये असे वाटत होते... पल्लवीच्या आवाजातील माधुर्याने त्याच्या हृदयाचा ठाव घेतला होता...

तिचा आवाज, तिची उत्तर देण्याची पद्धत, मधेच घेतलेला पॉझ... वाऱ्याने अलगद चेहऱ्यावर येणारे तिचे केस... कपाळावर, डोळ्यांवर आणि गालांवर त्यांनी केलेला अलगद, हळुवार स्पर्श... त्यांना अलगद बाजूला सारण्याचा तिचा प्रयत्न... ते मधेच लाजेने लाल होणे... तिच्या परफ्यूमचा हॉलभर पसरलेला सुगंध... सगळेच अक्षयला हवेहवेसे वाटत होते...

दाखवण्याचा कार्यक्रम पार पडला. नंतर दोन तीन वेळेस पल्लवी आणि अक्षय भेटले. एकमेकांच्या आवडी-निवडी... स्वभाव... विचार जुळतायत का आणि आपण एकमेकांना कितपत कंपॅटिबल आहोत हे समजून घेण्याचा प्रयत्न होता तो. नाहीतर ते दोघे एकमेकांना प्रथम दर्शनीच आवडले होते

अक्षय आणि त्याच्या घरच्यांकडून होकार आल्यावर सुधाकर रावांनी पल्लवीचेही मत जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तिचा फुललेला... भविष्याच्या रंगछटा धारण केलेला चेहरा पाहूनच त्यांना तिचे उत्तर कळले होते.

पल्लवी आणि अक्षय एकमेकांना पसंत पडले. त्यांचे लग्न नजीकच्या च शुभमुहूर्तावर करण्याचे ठरले... एकच महिना राहिला होता लग्नाच्या तयारीसाठी...

दोघेही जोडीने शॉपिंगसाठी फिरत होते... अक्षयच्या आणि अबोलीच्या पसंतीनेच ती लग्नाचा शालू, दाग-दागिने, घरात लागणाऱ्या वस्तू  घेणार होती...

सुधाकररावांनी आलेल्या पाहुण्यांना काही कमी पडू दिले नाही... लग्न ठरलेल्या मुहूर्तावर उत्तम रीतीने पार पडले...

पल्लवीने आता नवीन आयुष्यात पाऊल ठेवले होते ती नवीन जागी... नवीन लोकांमध्ये जुळवून घेण्याचा प्रयत्न करत होती. ती तिच्या संसार सुखात रममाण झाली होती. मॉल मधला तो प्रसंग एव्हाना तिच्या डोक्यातून निघूनही गेला होता.

आता अबोलीने इंटरव्ह्यू द्यायला सुरुवात केली होती...

मुंबई मधीलच कंपनीमध्ये तिचा आज इंटरव्ह्यू होता... ती बाहेर खुर्चीवर बसून फाईल मधील डॉक्यूमेंट्स चाळत बसली होती...

तिला इंटरव्ह्यूसाठी आत बोलावण्यात आले... तिने केबिनचे दार उघडले आणि "मे आय कम इन" असे विचारले... "यस" असे इंटरव्ह्यूअर म्हणाला... तशी ती आत गेली... इंटरव्ह्यूअर च्या चेहऱ्यासमोर फाईल होती... म्हणून अबोलीला त्याचा चेहरा नीटसा दिसला नाही...

इंटरव्ह्यूअरने फाईल ठेवली आणि इंटरव्ह्यूला सुरुवात झाली... अबोलीने वर पाहिले... तिला इंटरव्ह्यूअरचा चेहरा ओळखीचा वाटला... कुठे पाहिले याची लिंक तिला लागत नव्हती...

इंटरव्ह्यू चांगला झाला... अबोली घरी येत असतानाही इंटरव्ह्यूअरला आपण कुठे पाहिले होते याचा विचार करत होती...

बऱ्याच वेळ विचार केल्यानंतर तिला लिंक लागली... पुण्यात  मुलाने डाव्याबाजूने ओव्हरटेक करून ड्राइवर काकांशी वाद घातला होता तो होता हा... संकेत राजाध्यक्ष...

तो लीड होता त्या कंपनी मध्ये... फक्त पाच वर्षांचा एक्सपीरियन्स होता त्याला... पण आपल्या परफॉर्मन्समुळे तो लीड झाला होता... अबोलीला खूप हसायला आले कारण तो पुण्यातील प्रसंग तिच्या डोक्यातून निघूनही गेला होता...

अबोली सिलेक्ट झाली होती... ती अपॉइंटमेंट लेटर घेण्यासाठी थांबली होती...  ते हातात आले आणि तिचा आनंद गगनात मावेना...

सुधाकररावांना आणि पल्लवीला फोन करून सांगितले... पल्लवीने देवासमोर साखर ठेवली...

फोन ठेवला आणि समोर संकेत दिसला तिला... दोघांची नजरा-नजर झाली आणि दोघेही हसले... संकेत जवळ आला आणि म्हणाला... "कॉन्ग्रॅट्स, होप टू सी यू सून"

अबोलीचा आज ऑफिस चा पहिला दिवस... छान तयार होऊन फॉर्मल्स मध्ये ती वेळेच्या अगोदरच डेसिग्नेटेड बस स्टॉप वर कंपनीच्या बसची वाट पाहत उभी होती... कंपनीचा लोगो असलेली बस स्टॉपकडे येताना दिसली आणि अबोलीची धडधड वाढली... अबोली इतर एम्प्लॉयीस बरोबर बस चढली...

तिला खूपच वेगळे फील होत होते... सगळयांच्या गळयात कंपनीचे आयडेन्टिटी कार्ड होते... तिला अजून ते मिळायचे होते...

बस ऑफिसमध्ये आली... अबोली रेसेप्शन एरिया कडे गेली... तिथे नवीन लोकांना एस्कॉर्ट करायला एच आर आली होती... त्यांना टेम्परररी आयडेंटिटी कार्ड देण्यात आले... पर्मनंट आयडेंटिटी कार्ड यायला कमीत कमी पंधरा दिवस लागणार होते...

अबोलीचे ट्रेनिंग झाले... आता रँकिंग प्रमाणे प्रोजेक्ट मिळणार होते...

अबोलीला संकेतच्या टीम मध्ये टाकण्यात आले... तिला पर्मनंट आयडेन्टिटी कार्ड मिळाले होते...

तिने खूप दुर्लक्ष करायचा प्रयत्न केला पण तिला तो पुण्यातील प्रसंग वारंवार आठवत होता...

संकेतने तिला आता हळूहळू टास्क्स द्यायला सुरवात केली होती... काही अडले तर ती संकेताला विचारत असे ... संकेतहि बऱ्याचदा तिला मदत करण्याच्या बहाण्याने तिच्या जवळ जाऊन बसत असे...

संकेत सतत चोरट्या नजरेने तिच्याकडे पाहत असायचा... त्याच्या मनावर अबोलीचे प्रतिबिंब त्याच दिवशी कायमचे मुद्रित झाले होते... पण तो  सांगण्याची घाई करणार नव्हता...

अबोलीचा सहा महिन्यातच कामात चांगला हात बसला होता...

*******************************************************************

*प्रकरण ६*

अबोलीच्या मनात तो मॉल मधील प्रसंग आत्ताच घडल्या प्रमाणे अजूनही जीवंत होता. तिला खूप कसे तरी व्हायला लागले कि ती रियाझ करायला बसे. गाण्यात मन रमले कि तिला काहीसा या गोष्टीचा विसर पडत असे.

आधी पल्लवी होती... मन मोकळे करायला. आता अबोली एकटीच असल्या कारणाने डोक्यात तेच विचार येऊ लागले. तिला झोप काही लागेना. ती उठली नि सरळ देवघरात गेली. देवाला तिने परत प्रश्न केला "आता ती आमच्या आयुष्यात कधीच नसणार या दृष्टीने आम्ही आमचे मन बनविले असताना तिच्या अश्या अचानक समोर येण्याचे प्रयोजन काय... देवा नक्की काय आहे तुझ्या मनात". असे म्हणत असतानाच तिला हुंदका अनावर झाला. काही काळ ती तशीच रडत होती. देवघरातच ती बसून होती बराच वेळ... सुन्न मनाने देवाकडे पाहत.

पण मनाशी काहीतरी ठरवून ती झोपायला गेली.

दुसऱ्या दिवशी रविवार होता. तिने आशिषला (तिच्या मामला) कॉल करून बाहेर भेटायला बोलावले. आशिष आला. थोडे इकडचे तिकडचे बोलणे... गप्पा झाल्या...

मग थोडा वेळ अबोली गप्पच होती. तिला विषयाला कुठून नि कशी सुरुवात करावी ते कळेना. चेहराही गंभीर झाला होता तिचा. आशिषच्या ते लक्षात आले. तो तिला मन मोकळे... कसलाही संकोच न बाळगता बोल असे म्हणाला.

तेव्हा अबोलीने मनातील ईच्छा बोलून दाखविली. ती म्हणाली तिने सुधाकररावांना विचारले आहे आणि त्यांची काही हरकत नाही. आशिषला जसा आश्चर्याचा धक्का बसला... तसाच आनंदही झाला. त्याच्या मनात आले शेवटी योग जुळून आला म्हणायचं.

पुढील रविवारी अबोली तिचा गायनाचा क्लास उरकून आशिषच्या घरी... वर्षाला भेटायला गेली. वर्षाही आशिषच्या घरी तिला भेटण्यासाठीच आली होती.

अबोलीच्या मनात धाक-धुक चालू होतीच. पण तिला पडलेल्या काही प्रश्नांची उत्तरे वर्षाच देऊ शकेल असे तिला वाटले. म्हणून या प्रसंगाला सामोरे जाणे तिला भाग होते.

वर्षा आणि अबोली बोलू लागल्या. वर्षाने तिची ख्याली खुशाली विचारली. अबोली मात्र तुटकच वागत-बोलत होती. थोडा विचारांचा काहूर शांत झाल्यावर ... ती शांत झाली... आणि मग ती वर्षाला विचारू लागली कि असे काय कारण झाले कि ५ आणि ७ वर्षांच्या मुलींना सोडून तिला जावे लागले. एवढ्या चिमुरड्यांना सोडून तिचे पाय घराबाहेर पडू कशे शकले.

वर्षालाही कळत होते कि आता मुली मोठ्या झाल्या आहेत आणि त्यांच्या प्रश्नांना कधी ना कधी सामोरे जावे लागणार. पण सुरुवात कशी नि कोठून करावी हे वर्षाला कळेना.

वर्ष अबोलीला सांगू लागली. “अबोली... दोन माणसांचे विचार हे नेहमीच भिन्न असतात. आणि त्यांच्या मधील वैचारिक अंतर प्रमाणाबाहेर वाढले कि असे निर्णय घ्यावे लागतात. याच कारणामुळे सुधाकर आणि मी वेगळे झालो. निर्णय घेणे दोघांसाठीही खूप कठीण होते. पण विचारांमधील अंतर इतके वाढले होते कि प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आमचे खटके उडायला लागले होते. दोघेही घरात असलो तरी बऱ्याचदा भयाण शांतता पसरलेली असायची. त्यात तुम्ही दोघी लहान. आम्ही हे सारे कसेतरी दोन वर्ष रेटले. पण अंतर कमी होण्याऐवजी वाढतच चालले होते. आता चूक कोण बरोबर कोण हा भाग वेगळा. पण लहान मुलांना हे वातावरण पोषक नसल्याने आम्ही दोघे विभक्त झालो. ”

“हे कळते मला. पण दोन चिमुरड्या जीवांना सोडून तू जाऊ कशी शकलीस? आणि त्याही मुली असताना? मुलींना आईची किती गरज असते हे तू एक स्त्री असून समजू शकली नाहीस? तू आमची कस्टडी मिळवण्यासाठी प्रयत्न केले नाहीस? “

“असं कसं म्हणतेस अबोली. मी तुमच्या दोघींचीही कस्टडी मिळवण्यासाठी प्रयत्न केले... पण मी वर्किंग नव्हते आणि तुमच्या बाबांवर पूर्ण अवलंबून होते. त्यामुळे कोर्टाने निर्णय त्यांच्या पक्षात दिला. मी पूर्ण कोलमडून गेले होते अबोली. तुम्हा दोघींशिवाय मी कशी राहणार होते. मला वेड लागण्याची वेळ आली होती. ”

हळूहळू जॉब शोधून... कामाला सुरुवात केली. मन कशात तरी गुंतवायला हवेच होते ना. कामामुळे दिवसातील ७-८ तास तरी मनातील विचार आच्छादिलें जात होते. तरीही ऑफिस मध्ये देखील कधी-कधी मधेच तुमची आठवण येऊन हुंदका अनावर व्हायचा. पण जीवन जगणे तर भाग होते. असेच ५-६ महिने चालू होते. पण एकटेपणा खायला उठायचा... तुम्हा दोघींच्या आठवणीने तर मी पार कोलमडून जायचे.

आशिषला हे सर्व कळत होते. माझी चलबिचल... माझी खराब होत चाललेली मनस्थिती... सगळे सगळे त्याने जवळून पाहिले आहे. यावर काहीतरी उपाय शोधणे गरजेचे असल्याचे त्याला जाणविले.

आशिषला जो एकमेव उपाय दिसत होता तो म्हणजे मी परत लग्न करणे. आशिषने मला दुसऱ्या लग्नाबद्दल माझे ओपिनिओन विचारले. मी त्या कशाचाही विचार करण्याच्या मनस्थितीत नव्हते. मी काही उत्तर दिले नाही कारण मला कशातच रस उरलेला नव्हता. ती माझ्यासाठी एक डिप्रेशनची फेज होती. असे बोलत बोलत वर्षाला भरून आले... हुंदका अनावर झाला... आणि तिने अबोलीला मिठी मारली. तरीही अबोलीच्या स्पर्शात आपलेपणा नव्हता... आईबद्दल सिम्पथी नव्हती. फक्त तिच्या मनातील आईबद्दलची अढी थोडी कमी झाली होती इतकेच.

वर्षाने स्वतःला सावरले. ती पुढे सांगू लागली.

“आशिषने एव्हाना स्थळे बघण्यास सुरुवात केली होती. माझ्यासमोर पूर्ण आयुष्य पडले होते... एकटी कशी जगणार... या काळजीपोटी आशिषने माझे लग्न जमवून आणले... मी नकोच म्हणत होते... पण त्याने पुढचा विचार करून हा निर्णय घेतला होता”

वर्षा आणि अबोली दोघीही बराच वेळ तश्याच गप्प बसून राहिल्या. अबोली हे सर्व ऐकून सुन्न झाली होती. तिला आता कोणाशीच बोलण्याची ईच्छा राहिली नव्हती. तिला एकांत हवा होता. ती आशिष नि वर्षाचा निरोप घेऊन तिकडून निघाली.

अबोली घरी आली तेव्हा संध्याकाळ होत आली होती. तिने आल्या आल्या स्वतःला बेडवर झोकून दिले. तिच्या डोक्यात विचार चालूच होते आणि त्यांची सोबत डोळया मधील अश्रू करत होते. तिला आत्ता पल्लवीची खूप आठवण येत होती. ती जवळ असायला हवी होती असे वाटत होते. तिच्या बरोबर सर्व शेयर करायचे होते तिला... तिचा दृष्टीकोन जाणून घ्याचा होता. पल्लवी फार छान पद्धतीने एखादी गोष्ट समजावून घेत असे... अनालाइज करत असे आणि समजूनही सांगत असे. अबोली तशीच बराचवेळ पडून राहिली... विचार करून करून सुन्न झाली होती ती अगदी. डोके जड झाले होते तिचे.

थोड्या वेळाने ती उठली. फ्रेश होऊन... चहा करून प्यायली. तिला पल्लवीची खूप जास्तच आठवण येत होती आता... खूप गप्पा माराव्या वाटत होत्या तिच्याशी...

तिचा फोन वाजत होता. तिची विचारांची लिंक तुटली.

*********************************************************************

*प्रकरण ७*

पल्लवी चा कॉल होता. पल्लवी सासरी मजेत होती. ती मजेत आहे कळल्यावर तिला हे सांगून तिचा मूड खराब होईल कि काय असा विचार करून अबोलीला तो विषय काढावा वाटला नाही. सो ती इकडच्या तिकडच्या गप्पा मारत राहिली. फोन ठेवताना पल्लवी म्हणाली कि ती घरी येणार आहे मुंबईला राहायला एका आठवड्यासाठी. अक्षय काही काळासाठी ऑन साईट चालला आहे अमेरिकेला.

अबोलीचा आनंद गगनात मावेना. तिच्या आवाजातला उत्साह पल्लवीला फोनवरही जाणवत होता. फोन ठेवला तरीही अबोली... पल्लविचाच विचार करत होती. ती कधी येतेय नि कधी आपण तिला सर्व सांगतो असे तिला झाले होते.

दुसऱ्या दिवशी पल्लवी आली. आल्या आल्या अबोलीने तिला घट्ट मिठी मारली आणि रडायला लागली. पल्लवीला वाटले कि खूप दिवसांनी आपण भेटलो आहोत म्हणून तिला रडू आले असेल. पल्लवी तिला म्हणाली “अहो वेडाबाई... आहे मी आता इकडे काही दिवस... आजच सगळे पाणी संपवणार की काय... उद्यासाठी पण थोडे शिल्लक ठेवा...” आणि दोघीही हसू लागल्या.

पल्लवीने रूम मध्ये बॅग ठेवली आणि ती फ्रेश झाली. अबोलीने तिला चहा करून दिला. थोडे निवांत झाल्यावर त्यांच्या गप्पा सुरु झाल्या. ती आपल्या सासरचे गोडवे गात होती... अक्षय कसा आहे... घरचे वातावरण... जॉब... हे सगळे विषय बोलली. ती एकंदरीत आनंदी दिसत होती. अक्षयच्या प्रेमाच्या रंग छटा नी तिचा चेहरा उजळला होता. त्याच्या प्रेमाच्या इंद्रधनूने तिच्या हृदय रुपी आसमंताला व्यापून टाकले आहे हे कळत होते. तिच्या मनाला फुटलेल्या पालवीचा बहर तिच्या बोलण्यातून ओसंडून वाहत होता.

अबोली हे सर्व ऐकत होती. पण तिचा हवा तसा बोलण्यात सहभाग नाही हे पल्लवीच्या लक्षात आले... बोलत बोलत ती स्वतः मध्ये हरवून गेली आहे असे तिला दिसले. तिने अबोलीच्या डोळया समोरून आपला हात फिरविला. तशी ती भानावर आली. पल्लवीने ओळखले कि अबोलीला काही बोलायचे आहे . ती म्हणाली "बोला मॅडम... काय विचार करताय".

अबोली एकदम रडायलाच लागली. पल्लवीला काही कळेना कि काय झाले आहे.

अबोलीने सगळा इति वृतांत सांगितला. पल्लवीला काय रिॲक्ट व्हावे कळेना. पल्लवीने ही कधी वर्षाला भेटण्याचा प्रयत्न केला नव्हता कि तिच्या कडून कोणत्याच स्पष्टीकरणाची अपेक्षा केली नव्हती.

अबोली जाऊन बोलून आली आणि इति वृतांत जाणून आली... अबोली आपल्या मनस्थितीचे वर्णन करत असताना मात्र... जो हुंदका... जो त्रास तिने वर्षाला जाणवूही दिला नव्हता... त्याचा बांध आता फुटला होता आणि भावनांचा पूर आला होता.

पल्लवी तिला शांत करण्याचा प्रयत्न करत होती. पण तिलाही भावना अनावर झाल्या होत्या. आणि दोघीही बराच काल रडत होत्या.

सगळेच मोठे चाम्ताकारिक होते... इतके दिवस जवळ नसल्यामुळे तिच्याशी अटॅचमेंट फार वाटत नव्हती. पण सगळी कहाणी ऐकल्यावर... परिस्थितीपुढे माणूस किती हतबल असतो असे त्या दोघींना वाटले.

पल्लवीलाही आता वर्षाला भेटण्याची ईच्छा झाली. त्यांनी सुधाकर रावांची परवानगी घेऊन पुन्हा वर्षाला भेटायला जायचे ठरिवले. अबोलीने आशिषला फोन करून वर्षाचा नंबर घेतला. तिघीही बाहेर भेटणार होत्या.

हॉटेलचे टेबल... त्यावर पाण्याचे ग्लास ... शेजारीच असलेले मेनूकार्ड... डोक्यावर सुरु असलेला फॅन... शेजारीच असलेली खिडकी... तिथून अधून-मधून येणारी वाऱ्याची झुळूक अबोलीच्या केसांशी खेळात होती...

पल्लवी आणि अबोली वर्षाची वाट पाहत होत्या... ठरलेली वेळ झाली होती... अबोलीला वर्षा हॉटेलमध्ये शिरताना दिसली... अबोलीने पल्लवीला डोळ्याच्या खुणेने सांगितले... वर्षा आली आणि दोघींच्या समोर असलेल्या खुर्चीवर बसली... वेटरने तिसरा पाण्याचा ग्लास आणि एक्सट्राचे मेनूकार्ड आणून बाजूला ठेवले...

वर्षाने पाण्याचा घोट घेतला आणि काय घेणार असे दोघींना विचारले... तीन कॉफी ऑर्डर करण्यात आल्या...

कॉफी घेत घेत त्यांचे संभाषण सुरु झाले... या वेळेस अबोलीला वर्षा थोडी कमी अनोळखी वाटली. पल्लवी आणि अबोलीला एकदम पाहून वर्षाला पुन्हा आनंद झाला... गहिवरून आले... संमिश्र भवनाचा लपंडाव चालू होता तिच्या मनात या घडीला. बाहेर हॉटेल मध्ये बसले असल्या कारणाने तिने स्वतःला सावरले... रुमालाने डोळे टिपले आणि तिने संभाषणाला सुरुवात केली. मग थोडी अबोलीही बोलू लागली.

पल्लवी बराच वेळ गप्प होती. त्यांचे संभाषण ऐकत होती. वर्षा पल्लवीशी बोलू लागली. तसा तिचा संभाषणात सहभाग वाढत गेला. ती लहानपणापासूनच समजूतदार होती. ती एखाद्या परिचयाच्या व्यक्तीशी बोलतो तितपतच आपुलकीने वर्षाशी बोलू लागली. पल्लवीला सारे अबोली कडून समजलेलेच होते. म्हणून तिलाही सुधाकर आणि वर्षा यांना वेगळे का व्हावे लागले याची कल्पना आली होती.

वर्षाने पल्लवीच्या जॉब विषयी... तिच्या संसारा विषयी... आपुलकीने चौकशी केली. ती त्यांचे रूटीन जाणून घेण्याचा प्रयत्न करीत होती. अबोलीशी तर बऱ्यापैकी बोलणे तिचे झालेच होते. पल्लवीशी बोलताना तिचा समजूतदारपणा... तिची विचारांची स्टॅबिलिट, सर्टनटी वर्षाच्या लक्षात येत होती.

वर्षाला हायसे वाटले की मुलीं बरोबरचा हरवलेला संवाद सुरु होत होता... सुरु झाला होता.

अश्याच वरचे वर भेटी-गाठी वाढत गेल्या आणि ऑक्वरडनेस... अनसर्टनटी हळूहळू नाहीशी होऊ लागली... आणि सुसंवादा कडे वाटचाल सुरु झाली...

सुधाकरराव मुलींना त्यांची स्पेस देत असत. घरात अतिशय मोकळे वातावरण होते. पण तरीही अबोली आणि पल्लवीने वेळोवेळी सर्व प्रकार त्यांच्या कानावर घातला होता. वर्षा आणि मुलींमधील अढी कमी होऊ लागलेली पाहून त्यांना ही आनंदच झाला होता. आमच्या नात्या मधील दुराव्याचे पडसाद मुलींच्या आयुष्यात उठता कामा नये असेच त्यांना वाटत असे.

अबोलीही आता जॉब मध्ये रुळली होती.

जॉब करत असली तरी ही गाणे हीच तिची पहिली आवड होती. जॉब हा फक्त अनुभव घेण्यासाठी करत होती ती... जॉब बरोबरच तिचा रियाझ तिच्या गुरूजींचे मार्गदर्शन... तिचे गायनाचे कार्यक्रम... हे चालूच होते.

अबोलीच्या गळयातले माधुर्य कार्यक्रमासाठी श्रोत्यांचे प्रवाह खेचून आणायचे. सुधाकरराव आणि पल्लवीसाठी ही फार अभिमानाची गोष्ट होती.

आज अबोलीचा कार्यक्रम होता. ती गुरुजींना साथ देणार होती. आजच्या कार्यक्रमाला अबोलीने वर्षा आणि आशिषला देखील बोलावले होते.

अबोली आणि तिचे गुरुजी सज्ज होऊन व्यासपीठावर बसले. त्यांना पाहताच प्रेक्षकांची जी कुजबुज... आपापसात जे बोलणे चालू होते ते थांबले. सर्वांचे लक्ष कार्यक्रम सुरु होण्याकडे लागले.

निवेदकाने कार्यक्रमाची सुरुवात केली. सर्वत्र शांतता होती आणि फक्त निवेदकाचा आवाज ऐकू येत होता. त्याने गुरुजी आणि अबोली कडे कार्यक्रमाची धुरा सोपवली.

गुरुजींनी नेहमीप्रमाणे कार्यक्रमाला सरस्वती वंदनेने सुरुवात केली. मग एकेक बहारदार शास्त्रीय संगीताचे स्वर... ताना... अबोलीही घेऊ लागली. कार्यक्रम अगदी रंगून गेला होता. वर्षा आणि आशिषने अबोलीच्या गायनाचे कौतुक बऱ्याच लोकांकडून ऐकले होते. पण

प्रत्यक्ष अनुभव अगदी शहारे आणणारा होता. वर्षाच्या डोळ्यात तर आनंद अश्रूंनी गर्दी केली होती.

कार्यक्रम संपला होता. गुरुजी आणि अबोली स्टेजवर उभे राहिले आणि श्रोत्यांना नमस्कार केला. सगळे श्रोते उभे होते आणि टाळ्यांच्या कडकडाटाने आसमंत दुमदुमून गेला होता.

*प्रकरण ८*

पल्लवीच्या लग्नाला २ वर्षे पूर्ण झाली होती. अक्षयला अमेरिकेवरून परत येऊन आता वर्ष लोटले होते... अक्षयचे आणि तिचे प्रमोशन होणार होते. तिच्या कडे गोड बातमी होती.

इकडे अबोली जॉब आणि गायन बॅलन्स करत होती...

संकेतने ओळखले होते कि अबोलीशी बोलायला आता उशीर करून चालणार नव्हता... त्याच्या घरून त्याला स्थळे पाहण्यासाठी वारंवार सांगण्यात येत होते...

संकेतने अबोलीला कॉफीसाठी विचारले... "मी सोडेन आज घरी तुला"

तो तिचा लीड होता सो तिला नाही म्हणता येत नव्हते आणि हो तिला म्हणायचे नव्हते... तिने फक्त होकारार्थी मान डोलावली...

संकेत आणि अबोली कॉफी शॉप मध्ये बसले होते... अबोलीला काही कळत नव्हते कि संकेतने कॉफीसाठी बाहेर का बोलावले असेल...

संकेतने इकडचे-तिकडचे विषय काढायला सुरुवात केली... काम आवडत आहे का तुला ... नवीन मित्र-मैत्रिणी झाल्या असतील ना ... वगैरे वगैरे... अबोलीने जेवढ्यास तेवढी उत्तरे दिली.

संकेतने बोलत असतानाच अचानक तिचा हात हातात घेतला... अचानक घडलेल्या या गोष्टीने अबोलीच्या अंगावर शहारा आला...

तीचे गाल लाजेने लाल झाले होते... खूप ओशाळली होती ती... नजर कॉफीच्या कपवर खिळवून ठेवली होती तिने... वर पाहायची हिम्मत होत नव्हती तिची... तिला कळत नव्हते कि ते सत्य आहे कि तिचा भास... तो काहीच बोलला नव्हता अजून... पण अबोलीला हे संभाषण कोणत्या दिशेने जात असेल याचा अंदाज आला होता... ...

तिने स्वतःला सावरत अलगद आपला हात काढून घेतला... थोडावेळ शांतता पसरली होती... थोड्या वेळाने संकेतने डायरेक्ट विषयालाच हात घातला... "अबोली मला तू खूप आवडतेस... विल यू मॅरी मी" असे विचारले

अबोलीसाठी तो फक्त एक कलीग होता. तिने त्याच्याबद्दल तसा विचार कधीही केला नव्हता. ती त्याला म्हणाली होती... “तू वाईट वाटून घेऊ नकोस... पण माझ्या मनात

तसा कोणताही विचार नाही तुझ्याबद्दल. मित्र म्हणून राहू”. संकेतने ही ती गोष्ट पॉझिटिव्हली घेतली होती.

संकेतने तिला घरी सोडले... तो जात असताना अबोलीने मागे वळून पाहिले... एकमेकांकडे पाहून हसले...

अबोलीचा रात्रभर डोळयाला डोळा लागला नाही...

पावसाची रिमझिम सुरू होती..अबोलीच्या मनात ही विचारांचे ढग दाटून आले होते..ति संकेतला सरळ नाही म्हणाली होती..तरी पण हल्ली अबोली त्याचाच विचार करत होती..आताही ती पाऊस बघत खिडकी जवळ उभी होती आणि स्वतःशीच बडबडत होती..

मी का विचार करतेय त्याचा इतका.. हे बरोबर नाहीये.. मला कधी त्याच्याबद्दल तशा फिलिंग्ज नाही आल्या.. मग हल्ली हे काय होते आहे मला.. का त्याचाच चेहरा सतत डोळ्या समोर.. अबोली विचार करून करून सुन्न झाली होती.. बाहेर मात्र पावसाचा जोर वाढलेला होता.. पाऊस मुसळधार कोसळत होता..

एकाच टीम मधे असल्या कारणाने.. संकेत आणि अबोली यांची ऑफ़िस मधे नेहमी भेट होत होती.. संकेत सर्व विसरल्याचा आव आणून..आपापली कामे करायचा.. अबोलीची मदत करायचा..अगदी थरोह प्रोफेशनल प्रमाणे..

अबोलीच्या ऑफ़िस मधे दिवाळीच्या आधीच्या आठवड्यात वेगवेगळया प्रकारचे ईयरली इव्हेंटस्, कॉम्पिटिशन्स असत.. सिंगिंग, डान्स, रंगोली, दिया पेन्टींग.. ट्रेडीशनल डे च्या दिवशी बेस्ट ड्रेस्ड मेल एम्प्लॉई, बेस्ट ड्रेस्ड फिमेल एम्प्लॉई, बेस्ट ड्रेस्ड पेअर, बेस्ट ड्रेस्ड ग्रुप..

अबोलीने सिंगिंग, बेस्ट ड्रेस्ड फिमेल एम्प्लॉई या कॉम्पिटिशन्स मधे भाग घेतला होता..

बेस्ट ड्रेस्ड पेअरसाठी टीम मधे सर्वांनी आपापले पार्टनर्स निवडले होते.. संकेत ला पार्टनर नसल्याने ईच्छा असूनही भाग घेता येत नव्हता.. टीम मधील सर्वांनी अबोलीला फोर्स करून त्या इव्हेंट करिता संकेतचा पार्टनर बनविले.. म्हणजे त्यांची संपूर्ण टीम त्या इव्हेंट वर राज्य करेल असा विचार त्या मागे होता..

सिंगिंग मधे तर ती टेकनिकली स्ट्रॉन्ग होती.. तिथे ही तिच्या गळयातील गोडव्याने जजेस ना मोहीनी घातली. तिच्या अपोनन्टस् नी लेटस्ट मूव्हीज मधील गाणी म्हंटली..अबोलीने शास्त्रीय संगीताच्या जोरावर ती स्पर्धा जिंकली.

संकेत तिचे गाणे पहिल्यांदाच ऐकत होता..तिचा हा पैलू  प्रथमच त्याच्या समोर येत होता..तो गाण्यात रममाण होऊन गेला होता.. तो सध्या वेगळयाच विश्वात पोहोचला होता.. ऑडिटोरियम मध्ये फक्त तो आणि अबोलीच आहे.. आणि ती आपल्यासाठीच गाते आहे असे त्याला वाटत होते..

त्याचा नॉर्मल असण्याचा आव हळूहळू गळून पडत होता.. त्याच्या मनातील भाव पूर्व पदावर येत होते.. एवढया गोंधळात ही त्याला अबोलीच्या हृदयाचे ठोके स्पष्ट ऐकू येत होते..

संकेतला बेस्ट ड्रेस्ड मेल एम्प्लॉईचे अवॉर्ड मिळाले.. अबोली हि छान तयार होऊन आली होती.. पण तिचे अवॉर्ड थोडक्यात चुकले..

इंडिव्हीज्वल अवॉर्ड नंतर आता सगळे बेस्ट ड्रेस्ड पेअर च्या विनर च्या आनाऊन्समेन्ट ची वाट पाहत होते .. अबोली पण खूप आतुरतेने, दोन्ही हातांची बोटे एकमेकांत गुंतवून त्यावर हनुवटी टेकवून आनाऊन्समेन्टची वाट पाहत होती..

बेस्ट ड्रेस्ड पेअरचे अवॉर्ड अबोली आणि संकेतने जिंकले होते..अवॉर्ड घेताना दोघांची नजरा नजर झाली.. दोघेही अगदी मनस्वी हसले..

अबोलीच्या मनःपटलावर संकेतच्या रंगछटा अधिक गडद व्हायला सुरूवात झाली होती..

अबोली बराच वेळ तिचा आणि संकेतचा ट्रेडीशनल डे चा विनरची ट्रोफी घेतानाचा फोटो बघत बसली होती.. ..लाजत होती..तिलाच कळत नव्हते नक्की काय चालू होते..ती स्वतःशीच गुणगुणत होती..

"नाही कळले कधी जीव वेडावला ओळखू लागलो तू मला मी तुला..शब्द झाले मुके बोलती पैंजणे उतरले गाली या सोवळे चांदणे.."

हल्ली ऑफिसमधे त्यांची नजरा नजर झाली की अबोलीला ओशाळल्यासारखे व्हायचे..ती तिच्या ही नकळत ब्लश करू लागे.. त्याचे अचानक कधी लक्ष गेले तर ती कॉन्शिअस होत होती.. आपण असे वेड्या सारखे वागायला नको हे कळत असूनही तिचा तिच्या वागण्यावर कन्ट्रोल राहिला नव्हता..

संकेतला ही तिच्या वागण्या बोलण्यातील बदल हळूहळू जाणवू लागले होते..

अबोलीला कळून चुकले होते की तिला काय हवे आहे..ते मिळविण्यासाठी तिने आपल्या ध्येया कडे पाऊले टाकण्यासाठी सुरूवात केली होती..

संकेतला तिने टी टाईम च्या वेळी कॅफेटेरिया मधे बोलावले..ती खूप नरवस होती..

तो येऊन बसल्यावर तो काही बोलायच्या आतच अबोलीने गच्च डोळे बंद केले .. मोठा श्वास घेतला.. डोळे उघडून तिने आपल्या मनातील भावनांना वाट करून दिली.. संकेत मनोमन हसला.. त्याला विश्वास बसत नव्हता की त्याची स्वप्नपरी त्याच्या आयुष्य रूपी कॅनव्हास वर रंग भरण्यासाठी सज्ज झाली होती..

संकेत आणि अबोली आता गेल्या १ वर्षपासून एकमेकांना ओळखत होते.

संकेत तिच्या गायनाच्या कार्यक्रमाला आला होता. त्या दिवशीपासून तर तो जास्तच तिच्या प्रेमात पडला होता. ऑफिस मध्ये लंच... स्नॅक्स एकत्रच करत असत दोघे. एकमेकांच्या सोबती मध्ये वेळ कसा जात असे समजत नसे त्यांना.

संकेतच्या घरी मुली बघण्याचे वारे वाहू लागणार असे त्याच्या लक्षात आले होते. त्याने आणि अबोलीने घरी सांगायचे ठरविले. आधी संकेतच्या घरी सांगायचे ठरले. म्हणून त्याने त्याच्या घरी कल्पना देऊन ठेवली. अबोली भेटायला गेली होती त्याच्या आई-बाबांना. मुलगी पसंत पडली. संकेतच्या घरून कसलाही विरोध नव्हता तरी लग्नाची घाई मात्र होती. संकेत नि अबोली चा जीव भांड्यात पडला. एक मोहीम पार झाली होती. आता दुसरी मोहीम हाती घ्यायची होती. अबोलीच्या घरी ही सांगायचे होते.

अबोलीने आधी पल्लवीच्या कानावर हे सगळे घातले. पल्लवीचा तर विश्वासच बसत नव्हता कि चिमुरड्या अबोलीने तिच्या भावी जोडीदाराची निवड केली होती. ती स्वतःशीच विचार करू लागली कि अबोली एवढी मोठी कधी झाली.

अबोलीने पल्लवीला बाबांशी बोलण्याची जबाबदारी सोपवली. बहिणाबाईना मोहीम पार पडण्यास मदत करायची होती.

पल्लवीने नेहमीप्रमाणे समजूतदार पणाने विषय काढून... सर्व गोष्टी सुधाकर रावांच्या कानावर घातल्या.

सुधाकर रावांनी अबोलीला संकेत आणि त्याच्या आई-बाबांना घरी बोलावून घेण्यास सांगितले.

सगळे बोलणे झाल्यावर त्यांचे लग्न २१ जूनला करण्याचे आयोजिले.

लग्नाला अजून २ महिने अवकाश होता.. पल्लवीचे दिवस भरत आले होते.. आज-उद्यात डिलिव्हरी होईल असे डॉक्टरांनी सांगितले होते.. एकदा फॉल्स कळा येऊन गेल्या होत्या.. अक्षय कासावीस व्हायचा पल्लवीला होणारा त्रास पाहून.. आपण तिच्या जवळ बसण्यापलीकडे, तिचे सांत्वन करण्यापलीकडे काहीच करू शकत नाही याची खंतही त्याला वाटतं होती..

अबोलीचा फोन वाजत होता.. पल्लवीला कळा सुरु झाल्या होत्या.. तिला संजीवनी हॉस्पिटल मध्ये दाखल केले होते.. रात्रभर डॉक्टर, नर्स, अक्षय ची धावपळ चालू होती..

अगदी सकाळी सकाळीच अबोली आणि सुधाकरराव हॉस्पिटलमध्ये आले..

अकरा वाजता सकाळी पल्लवीची डिलिव्हरी झाली.. पल्लवीने गोंडस कन्या रत्नास जन्म दिला. अक्षय आणि पल्लवीने मुलगी झाली तर तिचे नाव ओवी ठेवायचे असे आधीच ठरवले होते.. त्यांना आजूबाजूच्या जगाचा पूर्ण विसर पडला होता.. ते दोघे त्यांच्या ओवी समवेत वेगळयाच विश्वात विहार करत होते..

अबोली आणि सुधाकर रावांचा आनंद गगनात मावत नव्हता..

# *प्रकरण ९*

तो सोनियाचा दिवस उगवला...

राज्याध्यक्ष कुटुंबियांच्या गाड्या मंगलकार्यालयाच्या आवारात दाखल झाल्या... संकेत, त्याचे आई-बाबा, इतर नातलग मंडळी...

सुधाकरराव आणि पल्लवी-अक्षय दरवाज्यातच उभे होते मंडळींचे स्वागत करण्यासाठी...

पल्लवीने संकेतचे औक्षण केले... राजाध्यक्ष कुटुंबियांवर अत्तरदाणीतून अत्तर शिंपडले जात होते... गुलाबांच्या पाकळयांच्या वर्षाव होत होता...

सर्व वातावरणात सुगंध, मांगल्य आणि चैतन्य दरवळत होते..

सर्व पाहुणे मंडळी कार्यालयात आली...

संकेतचे डोळे मात्र आत आल्यापासून भिरभिरत होते... पल्लवीने ते पहिले आणि म्हणाली "वूड बी जिजाजी, जरा धीर धरा... तुमची अप्सरा तयार होते आहे... अप्सरेला स्वर्गातून उतरायला वेळ लागणारच ना... येईल हो तुमची अप्सरा इतक्यातच... "

संकेत ला खूप ओशाळल्यासारखे झाले... अक्षय आणि पल्लवी मात्र मनसोक्त हसत होते...

विधी सुरु झाल्या होत्या तरी अबोलीचा अजून पत्ता नव्हता... संकेतचे डोळे अजूनही तिलाच शोधात होते...

गुरुजींनी मुलीला घेऊन या असे सांगितल्या वर पल्लवी आणि अक्षय तिला मंडपात घेऊन आले...

संकेत अनिमिष नेत्रांनी पायऱ्यांकडेच पाहत होता... त्याच्या हृदयलोकीची अप्सरा लग्नमंडपात अवतरली होती...

हिरव्या रंगाची नऊवारी साडी, खणाचा वाटणारा पण मॉडर्न बॅकलेस ब्लॉउज... खांद्यांवर मरून रंगाची राजेशाही वाटणारा शेला... हातातील हिरवा चुडा... . त्याला सामान भागात वाटणाऱ्या सोन्याच्या मॉडर्न डिझाईनच्या बांगड्या... दंडापर्यंत मेहंदीने भरलेले तिचे दोन्ही हात, गळयातील नाना तऱ्हेचे सोन्याचे आणि मोत्याचे अलंकार... सोन्याचे कानातले... मुंडावळया... नाकात मोत्याची नथ... तिचे रूप आणखी खुलवणारा तिचा मेक-अप... केशरचना... अगदी दृष्ट लागण्याजोगी दिसत होती अबोली...

पल्लवीने ती मंडपात जाण्यापूर्वीच आपल्या डोळयातील काजळाने तिच्या कानाच्या मागे तीट लावला होता... कोणाची नजर ना लागो माझ्या अबोलीला...

संकेत अजूनही तिलाच पाहत होता... गुरुजींनी त्याला आवाज दिल्यावर तो भानावर आला...

अबोली मंडपात येऊन संकेत च्या बाजूला बसली... त्यांची नजरा-नजर झाली... अबोली खूप लाजली... लज्जारूपी अलंकाराने तिचे रूप अजूनच खुलविले ...

सर्व विधी, सप्तपदी झाल्या... अबोलीच्या डोळयातून घळाघळा पाणी वाहू लागले... सुधाकरराव आणि पल्लवीही आपले अश्रू आवरु शकले नाहीत...

बाबांशी बोलून पल्लवी आणि अबोलीने वर्षा आणि आशिषला ही लग्नाला बोलावले. त्या दोघी पर्सनली इनव्हाइट करायला गेल्या होत्या.

वर्षा लग्नात उपस्थित असली तरी कन्यादान केवळ सुधाकर रावांनीच केले. पण आपण आपल्या एका लेकीचे तरी लग्न डोळ्याने पाहिले आणि त्यात सहभागी झालो यातच वर्षाने समाधान मानले होते.

संकेत आणि अबोली सर्व थोरा-मोठ्यांचे आशीर्वाद घेऊ लागले. संकेतचे आई-बाबा,सुधाकरराव, गुरुजी मंगेश जोशी आणि इतर मोठे लोक.

लग्न सोहळा अतिशय उत्तम रीतीने आणि लहान-थोरांच्या शुभेच्छांच्या गजरात पार पडला.

संकेत आणि अबोलीने आशिष आणि वर्षाचाही आशीर्वाद घेतला. वर्षाला भरून पावल्यासारखे वाटले.

अबोली मंगलकार्यालयाच्या पायऱ्या जड अंतःकरणाने आणि संमिश्र भाव भावनांच्या घेऱ्यात उतरत होती..

एकी कडे ती आनंदात होती कारण लग्न सोहळा छान पार पडला होता.. संकेतची आयुष्यभराची साथ तिला लाभली होती आणि हृदयरुपी आसमंतात नवीन क्षितिजावरची लाली तिला खुणावत होती.. तर दुसरीकडे सुधाकरराव आणि पल्लवीचा जड अंतःकरणाने निरोप ती घेत होती.. दोघांना डोळे भरून बघत होती. सुधाकर रावांचा त्याग, त्यांनी एकहाती दिलेले आई-बाबांचे प्रेम.. त्यासाठी घेतलेले अपार कष्ट... पल्लवी बरोबर व्यतीत केलेला लहानपणीपासूनचा एकेक क्षण.. त्यांची रूम .. त्यातील सर्व गोष्टी.. त्यांच्याशी असलेली अट्याचमेंट.. फ्लॅटचा हॉल.. सोफा.. पल्लवी आणि सुधाकररावां बरोबर तिथे घालवलेला वेळ.. एक ना अनेक गोष्टी फ्लॅशबॅक प्रमाणे तिच्या डोक्यात घोळत होत्या..

संकेतने कारचा दरवाजा उघडला आणि अबोलीची मनःस्थिती ओळखून तिच्या खांद्यावर अलगद आश्वासनाचा हात ठेवला.. तशी अबोली त्या अदृश्य घेऱ्यातून बाहेर आली..

तिने कारमध्ये बसण्या आधी पुन्हा एकदा मागे वळून पाहिले.. पल्लवीला पाहून तिच्या भावना अनावर झाल्या.. तिने पळत जाऊन पल्लवीला मिठी मारली.. पल्लवीने आईच्या मायेने पाठीवरून हाथ फिरविला.. अबोलीचे अश्रू पुसले आणि काळजी घे सांगून निरोप दिला..

संकेत आणि अबोली कार मध्ये बसले.. त्यावरील संकेत वेड्स अबोली चा बोर्ड नजरेआड होईपर्यंत अक्षय, पल्लवी आणि सुधाकरराव भरल्या डोळयांनी अबोलीला निरोप देत होते..

अबोली आणि संकेत दरवाजात उभे होते.. संकेतच्या आईने त्यांचे औक्षण केले आणि उंबरठ्यावरचे माप ओलांडून घरच्या लक्ष्मीला गृहप्रवेश करण्यास सांगितले.. संकेतच्या मावस बहिणींनी तिला दरवाजातच रोखले आणि उखाणा घेण्यासाठी आग्रह करू लागल्या.. अबोलीने सुंदर उखाणा घेऊन सर्वांची मने जिंकून घेतली..

"शिशिरात लागली आहे अबोलीला वसंताची चाहूल..,

संकेत सोबत ठेवते आहे आज ती संसाररूपी नंदनवनात पाऊल"

अबोली उखाणा घेताना लाजेने लाल गुलाबी झाली होती...तिच्या मनःपटलावर संकेतच्या प्रेमरूपी प्राजक्त फुलांचा सडा पडत होता आणि त्यात ती न्हाऊन निघत होती.

**--समाप्त--**

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडॆतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेतत्याशिवाय वर्षाला सुमारे तीस ते चाळीस . लाख वाचक वेबसाईटवरून पुस्तके डाऊनलोड करतात .

अर्थात याने आमचं समाधान नाहीसुमारे बाराकोटी मराठी माण्सांपै .की किमान अर्धे म्हणजे सहा कोटी लोक .माउलिंनी सांगितलंय .शी आमची इच्छा आहेव्हावेत अ ”वाचक“ “जो जे वांछिल ते तो लाहो”. आमचीही वांछा .पूर्ण करील ”तो“करीलच.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail.com या पत्त्यावर पाठवा बरं!